MHSN070000222025

## म.सं.कौ.हिं. का. क्र. १/२०२५ मधील नि.क्र. २३ वरील

## आदेश

**(मासायबी इम्रान पठाण वि. इम्रान आयुब पठाण )**

प्रस्तुतचा अर्ज जाबदारने म्हणणे नाही असा झालेला हुकुम रद्द करून मिळण्याबाबत सादर केलेला आहे.

२. जाबदारचे असे कथन आहे की, प्रस्तूतचे काम नि. ५ चे चौकशीसाठी नेमलेले असून सदर नि. ५ चे अर्जास व मुळ अर्जास जाबदार यांना दि. ०८.०८.२०२५ रोजी म्हणणे सादर केले होते. सदर ऑनलाईन म्हणणे सादर करताना विलंब माफी अर्ज, प्रतिज्ञापत्र व म्हणणे ऑनलाईन दि. ०८.०८.२०२५ रोजी दिले होते. परंतू नजरचुकीने विलंब माफीचा अर्ज हा म्हणणे याठिकाणी अपलोड झाला आहे त्यामुळे म्हणणे अपलोड झाले नाही. सदरची बाब जाबदार यांना समजून आली. म्हणून जाबदार यांनी त्यांच्या विरुध्द झालेला म्हणणे नाही आदेश रद्द होवून मिळण्याकरीता सदरचा अर्ज केला असून अर्ज मंजूर करण्यात यावा ही विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जास अर्जदार यांनी म्हणणे निशाणी क्र. २४ वर दाखल करुन अर्जतील कथने नाकारली आहेत. अर्जदार यांचे म्हणणे की, अर्जदार यांनी जाबदार विरुध्द कौटुंबिक हिंसाचाराचे अर्ज दोन वेळेस दाखल केले आहेत. त्या कामी जाबदार यांनी अर्ज काढून घेण्यास लावले. जाबदारचे सांगणेप्रमाणे त्या नांदणेसही गेल्या परंतू पून्हा मारहाण करुन घरातून बाहेर काढले व त्या कामीही अर्ज दाखल केले नंतर लवकर हजरही झाले नव्हते व म्हणणे ही दाखल केले

नव्हते. जाबदार यांना कायदेविषयक पूर्ण माहिती आहे ते जाणून बुजून अर्जदारला त्रास देण्यासाठी व मे. कोर्टाचा वेळ वाया घालवतात व खोटी कारणे लिहीतात. जाबदारचे वडीलांचे बायपास झालेचे कोणतेही पुरावे याकामी दाखल नाहीत. या अर्जासोबत जाबदाने म्हणणे दाखल केलेले नाही. अर्जदार यांना मुलाचे उदरनिर्वाह चालवणे अशक्य झाले आहे. जाबदार हे जाणून बुजून त्रास देण्यासाठी म्हणणे दाखल करण्यास विलंब केला आहे. तरी अर्ज नामंजूर करण्यात यावा व म्हणणे नाकारण्यात यावे अशी विनंती केलेली आहे. अर्ज मंजूर करण्याच्या निर्णयाप्रत मे. न्यायालय आल्यास प्रत्येक अर्जदारसाठी म्हणून र.रु. २०००/– कॉस्ट करण्याची विनंती केली आहे.

४. जाबदार व अर्जदार यांचे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाची पाहणी केली.

५. प्रकरणातील एकंदर परिस्थिती पाहता जाबदार यांनी नजरचुकीने अर्जाच्या म्हण्ण्याऐवजी विलंब माफीचा अर्ज अपलोड केला असल्याचे दिसत आहे. सदरची चुक ही तांत्रीक स्वरुपाची आहे. गैरअर्जदाराने यापुर्वी दाखल केलेला विलंबमाफीचा अर्ज खर्चावर मंजुर केलेला आहे. आजरोजी जाबदार अर्जावरील म्हणणे दाखल करत आहे. अर्ज नामंजुर केल्यास गैरअर्जदार तांत्रीक बाबीमुळे त्याचे म्हणणे मांडण्यापासुन वंचीत होईल परंतु, जाबदाराचे म्हणणे अभिलेखावर अपलोड झाल्यास नैसर्गीक न्याय होणार आहे. परंतू गैरअर्जदाराच्या चुकीने झालेल्या विलंबाबाबत जाबदार याने अर्जदारास खर्च म्हणुन रक्कम रुपये ३००/– खर्च अदा करणे उचित होईल. खालील आदेश पारीत करण्यात येतात.

## आदेश

**१.** अर्ज नि.क्र. २३ मंजुर करण्यात येत आहे.

**२.** जाबदार यांचे विरुध्द म्हणणे नाही आदेश रद्द करण्यात येतो.

**३.** जाबदारने झालेल्या विलंबापोटी, अर्जदार हिस रक्कम रु. ३००/– (रु. तीनशे फक्त ) पुढील तारखेपर्यंत दयावेत.

**४.** आदेशाप्रमाणे पुढील तारखेस पुर्तता न केल्यास सदर आदेश आपोआप रद्द होईल.

MAHESH ARVINDRAO KULKARNI

Digitally signed by MAHESH ARVINDRAO KULKARNI
Date: 2026.08.11 17:26:48 +0530

**(एम. ए.कुलकर्णी)**

दि. १०.०८.२०२६

सह दिवाणी न्यायाधिश (क.स्तर),
कवठेमहांकाळ.

## Certificate

I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per the original order / judgment.

| | | |
|---|---|---|
| | | |
| Name of the Stenographer | : | Mrs. J. A. Salunkhe.<br>(Stenographar grade - III) |
| Court | : | Jt. C.J.J.D. and J.M.F.C.,<br>Kavathe Mahankal. |
| Date | : | 10.08.2026 |
| Order /judgment signed by P.O. on | : | 11.08.2026 |
| Order /judgment uploaded on | : | 11.08.2026 |